महाराष्ट्र शासन

क्रमांक : अधापु-२०१७/प्र. क्र.४२ /नापु-२२
अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ११ एप्रिल, २०१७.

प्रति,

१) जिल्हाधिकारी ( नंदूरबार / जळगाव /बीड/अमरावती / बुलढाणा /अकोला /यवतमाळ/ नागपूर )
२) जिल्हा पुरवठा अधिकारी ( नंदूरबार / जळगाव /बीड/अमरावती / बुलढाणा /अकोला /यवतमाळ/ नागपूर )

**विषय :- राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत माहे मे,२०१७ करिता ज्वारीचे व गव्हाचे सुधारीत नियतन.**

**संदर्भ :-** १) केंद्र शासनाचे पत्र क्र. ७/३/२०१६-पीवाय-III, दि. २४ नोव्हेंबर,२०१६
२) शासन पत्र क्र. अधापु २०१७/प्र.क्र.६०/नापु -२२, दि. ३ मार्च, २०१७.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ अंतर्गत उपरोक्त संदर्भाधीन क्र. २ च्या पत्रान्वये माहे एप्रिल, २०१७ ते जून, २०१७ करिता अंत्योदय अन्न योजना व प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांकरीता जिल्हानिहाय मासिक नियतन मंजूर करण्यात आलेले आहे.

२. केंद्र शासनाने त्यांच्या उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ येथील पत्रान्वये कळविल्यानुसार तसेच खरीप पणन हंगाम २०१६-२०१७ मध्ये खरेदी करण्यात आलेल्या ज्वारीचे क्षेत्रीय स्तरावरुन प्राप्त झालेल्या मागणीनुसार माहे मे, २०१७ करिता बीड, बुलढाणा, अकोला, या जिल्ह्यांतील प्राधान्य कुटुंब गटातील लाभार्थ्यांकरिता व नंदूरबार, जळगाव, अमरावती,अकोला, यवतमाळ, नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील अंत्योदय अन्न योजनेतील लाभार्थ्यांकरीता मंजूर करण्यात आलेल्या गव्हाचे नियतन कमी करुन तेवढयाच प्रमाणात ज्वारीचे नियतन व गव्हाचे सुधारित मासिक नियतन सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविल्याप्रमाणे मंजूर करण्यात येत आहे.

**ज्वारीच्या दिलेल्या नियतनानुसार लाभार्थ्यांची आकडेवारी विचारात घेऊन किती परिमाणात ज्वारीचे वाटप कमी करावे याबाबत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी निर्णय घ्यावा. परंतु असे करताना ज्या महिन्यासाठी ज्वारीचे नियतन दिले आहे, त्या महिन्यामध्ये ज्वारीचे वाटप पूर्ण केले जाईल याबाबत दक्षता घ्यावी.**

३. इतर जिल्ह्यांकरिता संदर्भाधीन दि. ०३.०३.२०१७ च्या शासन पत्रान्वये मंजूर करण्यात आलेले गहू व तांदळाचे तसेच उपरोक्त जिल्ह्यांकरिता मंजूर करण्यात आलेले तांदळाचे नियतन कायम राहील.

४. सदर ज्वारी वितरीत करण्याचे दर पुढीलप्रमाणे राहतील :-

| | प्राधान्य कुटंब गट लाभार्थी (दर प्रति क्वि.) | अंत्योदय अन्न याजनेतील लाभार्थी (दर प्रति क्वि.) |
|---|---|---|
| केंद्रीय विक्री दर | १०० | १०० |
| बर्हिगोदाम दर | ३० | ३० |
| दुकानदारांचे मार्जिन | ७० | ७० |
| किरकोळ दर | १०० | १०० |

५. माहे मे, २०१७ च्या मंजूर करण्यात आलेल्या ज्वारीच्या नियतनाची रक्कम जमा करणे व धान्याची उचल करण्याकरिता वैधता कालावधी (Validity Period) माहे मे, २०१७ करिता विहित करण्यात आलेल्या कालावधी एवढाच असेल. तथापि, सदर उचल ही तातडीने करण्यात यावी. तसेच, सदर ज्वारीचे नियतन त्या-त्या जिल्ह्यांमध्ये खरेदी करण्यात आलेल्या ज्वारीच्या प्रमाणातच दिले असल्याने सदर ज्वारीचे तालुकानिहाय नियतन करताना कमीत कमी वाहतूक विचारात घेऊन नियतन करावे व ज्वारी उचल करुन वाटप करावे.

याव्यतिरिक्त संदर्भाधिन दि.०३.०३.२०१७ च्या शासन पत्रान्वये दिलेल्या सूचना सदर सुधारीत नियतनाकरितादेखील कायम राहतील.

६. ज्वारी वितरणाबाबत लाभार्थ्यांना अवगत करण्यासाठी “ज्वारीचे नियतन उपलब्ध आहे” अशा आशयाचे फलक प्रत्येक रास्तभाव धान्य दुकानाबाहेर लावण्याच्या सूचना सर्व रास्तभाव धान्य दुकानदारांना देण्यात याव्यात. त्यानुसार फलक लावले जात आहेत, याबाबत दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे स्थानिक वृत्तपत्रामध्ये यास प्रसिध्दीपत्रकाद्वारे विस्तृत प्रसिध्दी देण्यात यावी.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी

सोबत :- (विवरणपत्र "अ" )

प्रत :

१) उप आयुक्त (पुरवठा), नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.

त्यांना सूचित करण्यात येते की, माहे मे, २०१७ करीता ज्वारी व गव्हाच्या (सुधारित) नियतनाचे आदेश सर्व संबंधित जिल्ह्यांना ई-मेल व पत्राद्वारे पाठविण्यात आले आहेत. आपल्या विभागातील जिल्ह्यांना सदर आदेश प्राप्त झाले किंवा कसे, याबाबत खातरजमा करण्यात यावी. आपल्या विभागातील संबंधित जिल्ह्यांमध्ये नियतनानुसार धान्याची उचल होत असल्याची व त्याबाबतची माहिती “महाफूड” आज्ञावलीत दर आठवड्यात भरली जाण्याची योग्य ती दक्षता घ्यावी.

२) उपसंचालक, नागरी पुरवठा, पुरवठा आयुक्तांचे कार्यालय, मुंबई.

प्रस्तुत नियतनानुसार जिल्ह्यांनी केलेली उचल व वाटप याबाबतचा तपशील “महाफूड” आज्ञावलीद्वारेच प्राप्त करुन घ्यावा.

३) अवर सचिव, संगणक कक्ष, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, यांना विनंती करण्यात येते की, प्रस्तुत नियतनाची प्रत विभागाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यात यावा.

४) वित्तीय सल्लागार व उप सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, मुंबई.

५) कार्यासन अधिकारी (नापु-२९), मंत्रालय, मुंबई

६) निवडनस्ती कार्यासन नापु-२२, मंत्रालय, मुंबई.

(हेमंत वाडीकर)
कार्यासन अधिकारी

सोबत :- (विवरणपत्र "अ")

विवरणपत्र – अ

शासनपत्र क्र. अधापु-2017/प्र.क्र.42 /नापु-22, दि.11.04.2017 सोबतचे विवरणपत्र

## Monthly Revised Allocation for May, 2017 of Wheat and Jowar for PHH Category

| SR.NO. | Districts/Region | No. of PHH Beneficiaries | Allocation of Wheat made @ letter dt.03.03.2017. | Jowar Allocation (MT) | Revised allocation of Wheat | Total Quantum of Wheat + Jowar |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Beed | 1597306 | 4792.00 | 2.65 | 4789.35 | 4792.00 |
| 2 | Buldana | 1512805 | 3026.00 | 386.28 | 2639.73 | 3026.00 |
| 3 | Akola | 1056714 | 2113.00 | 1056.50 | 1056.50 | 2113.00 |
| TOTAL | | | 9931.00 | 1445.43 | 8485.58 | 9931.00 |

शासनपत्र क्र. अधापु-2017/प्र.क्र.42 /नापु-22, दि.11.04.2017 सोबतचे विवरणपत्र

## Monthly Revised Allocation for May, 2017 of Wheat and Jowar for AAY Category

| SR.NO. | Districts/Region | No. of AAY Beneficiaries | Allocation of Wheat made @ letter dt.03.03.2017. | Jowar Allocation (MT) | Revised allocation of Wheat | Total Quantum of Wheat + Jowar |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Nandurbar | 106493 | 1597.00 | 130.34 | 1466.66 | 1597.00 |
| 2 | Jalgaon | 137544 | 4126.00 | 355.90 | 3770.1 | 4126.00 |
| 3 | Amravati | 121935 | 2317.00 | 510.90 | 1806.105 | 2317.00 |
| 4 | Akola | 44851 | 852.00 | 448.51 | 403.49 | 852.00 |
| 5 | Yavatmal | 130451 | 2479.00 | 827.67 | 1651.327 | 2479.00 |
| 6 | Nagpur Rural | 70232 | 1405.00 | 14.65 | 1390.348 | 1405.00 |
| TOTAL | | | 12776.00 | 2287.97 | 10488.03 | 12776.00 |

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**

No. ADHAPU-2017/ C.R. 42/C.S. 22
Food, Civil Supplies and Consumer
Protection Department,
Mantralaya, Mumbai- 400 032,
Dated: 11th April, 2017.

To,

The General Manager,
Food Corporation of India,
Regional Office (Maharashtra),
FSD, Complex,
Dattapada Road, Rajendra Nagar,
Borivali (East), Mumbai- 400 066.

**Sub :- Allocation of Jowar and revised allocation of Wheat, for PHH and AAY Beneficiaries under NFSA for the month of May, 2017.**

Ref:- 1) Govt. of India letter No. 7/3/2016-PY –III, Dt.24.11.2016.
2) State Govt. letter no. Adhapu-2017/CR 60/CS 22, Dt.03.03.2017.
3) State Govt. letter no. Adhapu-2017/CR 42/CS 22, Dt.11.04.2017.

Sir,

District wise Allocation for the month of April, 2017 to June, 2017 under NFSA had been issued vide above referred letter dated 03.03.2017. As per the instructions given by Government of India letter dated 24.11.2016 State Government has issued district wise allocation of Jowar and revised Wheat for 8 districts in the State for the month of May, 2017.

2. The allocation of Jowar is being sanctioned by reducing the equal quantity of wheat allocation for the above 8 districts for the said months. The district wise allocation of revised allocation of Wheat and Jowar is shown in which is attached herewith.

Yours faithfully,

(signature)

**(Hemant Wadikar)**
Section Officer

Copy to: Collection, CS-22.